**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.संदीप प्रभाकर गुंडकिल्ली
१०४६, ई-वॉर्ड, बागल चौक, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर
महानगरपालिका, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ४७ / कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १५.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदीप प्रभाकर गुंडकिल्ली
१०४६, ई-वॉर्ड, बागल चौक, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर
महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त क्र.१,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.दिलीप रामचंद्र सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २१.६.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २१.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | ७.८.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |

८. **मूळ मागणीचा तपशील**

सर्व हातगाडी परवानाधारक (१९८० व १९९२/९३)यांना कोणत्या तारखेस व रजि. परवाना क्रमांकाने परवाना दिला आहे याची तारीखवार, सही शिक्क्यासहीत नक्कल.

## विवेचन

मध्यवर्ती बस स्थानकावरील हातगाडी परवाना धारकांना सन १९८० व १९९२-१९९३ मध्ये दिलेल्या परवान्याच्या तारखा व क्रमांक याची संबंधित परवान्याच्या नकलांसह माहिती मिळावी, अशी मागणी श्री.संदीप प्रभाकर गुडकिल्ली यांनी जन माहिती अधिकारी तथा सहय्यक आयुक्त क्र.१, कोल्हापूर महानगरपालका यांच्याकडे केली होती. संबंधित विषयाबाबत न्यायालयात दावा दाखल असल्यामुळे माहिती देण्यासाठी आणखी दोन महिन्यांची मुदत मिळण्याची मागणी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्र.१, कोल्हापूर महानगरपालिका श्री.दिलीप रामचंद्र सूर्यवंशी यांनी श्री.गुंडकिल्ली यांना दिलेल्या पत्रात केली. दि.१७.६.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी यादी दिली ती खोटी व चुकीची माहिती असल्याच्या कारणावरुन श्री.गुंडकिल्ली यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. उपलब्ध माहिती दिली आहे की नाही हे तपासणीसाठी श्री.गुंडक्लिल्ली यांनी अभिलेखाची पाहणी करावी, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्यानुसार श्री.गुंडकिल्ली यांनी दि.३.७.२००६ रोजी अभिलेखाची पाहणी केली, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी अपील निकाली काढले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाखालील मूळ अर्ज व प्रथम अपील होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द श्री.गुंडकिल्ली यांनी माहितीचा अधिकार अधिनमय २००५ खाली राज्य माहिती आयोगाकडे

अपील केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकाराखालील अर्ज विषय असूनही आयोगाने ते दाखल करुन घेतले. विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये उभय बाजूंना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला, परंतु एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली. आपण माहिती मागितलेल्याला दोन वर्षे होत आली तरी मागितलेली माहिती आपल्याला मिळाली नाही, असे श्री.गुंडकिल्ली यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. परवानाधारकांची फक्त नावे दिली, मात्र तारखा व परवाने क्रमांक दिले नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र अशी माहिती महानगरपालिकेच्या मूळ कागदपत्रांमध्येच नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्र.१ श्री.दिलीप रामचंद्र सूर्यवंशी यांनी मूळ नस्तीसह आयोगापुढे मांडले. त्यातील नस्तीनुसार असलेली सर्व माहिती दिली आहे. एका दाव्यात या विषयातील काही कागदपत्रे न्यायालयात सादर केली आहेत. अपीलकर्त्याने त्यांचे अवलोकन करावे यासाठी त्यांना बोलावूनही ते आले नाहीत, असेही श्री.सूर्यवंशी यांनी नमूद केले. आपण याप्रमाणे न्यायालयातील कागदपत्रे पाहण्यास गेलो नसल्याचे श्री.गुंडकिल्ली यांनी मान्य केले.

उपलब्ध नस्तीनुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली दिसते. ती नूतनीकरणाच्या अभिलेखा आधारे दिली आहे. मात्र संबंधित हातगाडीवाल्यांना दिलेल्या परवान्यांचे क्रमांक व तारखा ही माहिती नगरपालिकेच्या दप्तरी नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. मूळ कागदपत्रे महानगरपालिकेच्या दप्तरी असू नयेत, हे आश्चर्यकारक व अयोग्य आहे. अभिलेखांबाबतची अनास्था व गैरव्यवस्था त्यातून दिसते. माहिती देण्याबाबत अधिक सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारुन जन माहिती अधिकारी यांना संबंधित तपशील मिळविण्यासाठी अधिक प्रयत्न करता आले असते, त्यांनी तसे केलेले नाही. परंतु उपलब्ध माहितीतील कोणताही तपशील त्यांनी लपविलेला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनीही याबाबत लेखी ग्वाही दिली आहे. अपीलकर्त्यास अपुरी माहिती मिळाली हे स्पष्ट होते, मात्र त्यामागे जन माहिती अधिकाऱ्यांचा अयोग्य उद्देश असल्याचे अथवा त्यांनी ती माहिती लपविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शास्तीची मागणी मान्य करता येणार नाही. मात्र संबंधित माहिती अधिक प्रयत्नाने

अपीलकर्त्याला दिली जाणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची ही जबाबदारी आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) संबंधित हातगाडी परवाना धारकांशी संपर्क साधून परवाना क्रमांक व तो दिल्याची तारीख हा आवश्यक तपशील जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसात अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावा.

(३) न्यायालयात सादर केलेली कागदपत्रे पाहण्यास जन माहिती अधिकाऱ्यांच्या प्रस्तावानुसार अपीलकर्त्यांने जाणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांसोबत संबंधित कागदपत्राचे अवलोकन करावे व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क द्याव्यात.

(४) अपीलकर्त्याला माहिती नि:शुल्क द्यावी, परंतु संबंधित शुल्क महानगरपालिकेच्या अनुदानित रकमेतून न भरता संबंधित रकमा जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्र.१ व परवाना विभागाचे संबंधित लिपीक यांनी व्यक्तिशः भरावी.

(५) वरील पूर्तता करुन घेऊन पूर्तता अहवाल सादर करण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**कोल्हापूर**
**दि.१६.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९ + ५० /सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. गणेश आणणा धायगुडे,मु.पो.अंदोरी, ता.खंडाळा, जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी वाई, जि. सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपर जिल्हाधिकारी, जि.सातारा |

अपिलकर्ता गैरहजर. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २५७ अन्वये फेरतपासणीसाठी केलेला अर्ज फेटाळण्याचा निर्णय चुकीचा असून कोणत्या कायद्यानुसार अर्ज फेटाळला ते स्पष्ट करावे, अशी अपीलकर्त्याची मागणी आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना अपीलकर्त्याचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याने अपील निकाली काढण्याबाबतची विनंती केली आहे. तसेच अपील कर्त्याचा तो अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाची स्पष्टीकरणात्मक माहिती दिली आहे.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१)अपील निकाली काढण्यात येत आहे.

२)अपीलकर्त्याचा मूळ अर्ज फेटाळण्याबाबतची जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेनातील माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क व त्वरीत द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.३१.०५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४,
ताराराणी मार्केट, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१+८१ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा (१)विद्यमान प्रमुख शहर अभियंता व
उपशहर अभियंता, विभाग क्र.३ व ४, ताराराणी मार्केट, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर प्रतिनिधी श्री.नेत्रदीप शंकरराव सरनोबत
(२)तत्कालीन शहर अभियंता श्री.सुरेश नानासाहेब भोसले
(३)सहाय्यक संचालक नगररचना श्री.विजयकुमार गोस्वामी
(४)उपशहर अभियंता, विभाग क्र.३ व ४ श्री.एम.एस.निर्मळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००६ (अ.क्र.५१)<br>दि.३.४.२००६ (अ.क्र.८१) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.४.२००६ (अ.क्र.५१)<br>दि.-- (अ.क्र.८१) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.५.३००६ (अ.क्र.५१)<br>दि.२२.५.२००६ (अ.क्र.८१) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००६ (अ.क्र.५१)<br>१९.६.२००६ (अ.क्र.८१) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.५१/कोल्हापूर**

(१) ३० जून २००५ पासून उपअभियंता सा.बां.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका यांनी आपल्या कार्यक्षेत्रात शासनाने सूचना व जाहीर केलेल्या पूर नियंत्रण रेषा (रेड झोन)व नदी पात्र या अंतरामध्ये किती बांधकाम करण्यासाठी कोणाकोणाला परवानगी देण्यात आली, परवान्याच्या प्रती, परवानगी देताना शासनाची परवानगी घेतली होती काय, तसेच सध्या रेड झोन क्षेत्रात बांधकाम पूर्वी घेतलेला परवाना व प्राप्त परिस्थितीत चालू असलेले बांधकाम संबंधितांना नोटीसद्वारे केलेल्या सूचना यांच्या छायांकित प्रती. अर्बन लॅण्ड स्किमचे स्टेटमेंट आणि अर्बन नकाशा जोडला आहे काय,

(२) कोल्हापूर महानगरपालिकेच्या कर्यक्षेत्रातील २००१ पासून आजअखेर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २६०(१) अन्वये विनापरवाना, अनधिकृत, परवाना बाह्य बांधकामाबाबत संबंधितांना नोटीस दिल्या आहेत. त्यापैकी आजअखेर फक्त नोटीस दिल्या आहेत, परंतु बांधकाम परवानाबाबत कार्यवाही केली नाही अशी किती प्रकरणे पेंडिंग आहेत. त्याबाबत सि.स.नं., नाव व कार्यवाही न करणेचे कारण यांची माहिती.

**अपील क्र.८१/कोल्हापूर**

(१) माहे जुले २००५ मध्ये पंचगंगा नदीस पूर येऊन लक्ष्मीपुरी, शाहुपूरी व न्यू पॅलेस एरिया, ई वॉर्ड बऱ्याच घरात पाणी शिरले होते. ती बांधकामे शासनाचे परिपत्रक क्र.आयडीडब्ल्यू / १०८९ / २४२ / ८९ / वि.म-मंत्रालय, दि.२.६.१९८३ प्रमाणे आखण्यात आली होती किंवा कसे.

(२) जर पूररेषेच्या आतील बांधकामे असतील तर बांधकामास परवानगी ही कोणत्या निकषाचे आधारे दिली. परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव, पद. तसेच पूररेषेच्या आतील बांधकामाना दिलेल्या परवानगीची यादी(लक्ष्मीपुरीतील तापडिया सुपर मार्केट व इतर माहिती. पूर नियंत्रण रेषेच्या आत बांधकाम परवानगी देण्याच्या ठरावाची छायांकित प्रत

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, कोल्हापूर यांनी जुलै, ऑगस्ट २००५ मधील
पंचगंगा नदीच्या पुरानंतर निश्चित केलेली पूरनियंत्रण रेषा व त्या रेषेच्या आतील बांधकाम
याबाबतची, तसेच शासनाने जाहीर केलेल्या पूरनियंत्रण रेषा (रेड झोन) क्षेत्रात दि.३० जून २००५
पासून दिलेले बांधकाम परवाने, बांधकामाबाबतच्या नोटिसा इ.च्या प्रती, तसेच कोल्हापूर
महानगरपालिका क्षेत्रात सन २००१ पासून महानगरपालिका आयुक्तांनी विनापरवाना
बांधकामाबाबत केलेली कार्यवाही याविषयी माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी
जन माहिती अधिकारी (उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.४, कोल्हापूर
महानगरपालिका व जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका
यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले
केली आहेत.

सन २००५ चा महापूर येण्यापूर्वीच दि.२९.१०.२००४ रोजी बांधकामाचे नकाशे मंजूर
करण्यात आलेले आहेत. तसेच कोल्हापूर शहर दुसऱ्या सुधारित विकास योजनेच्या अंतर्गत
नियमावलीनुसार त्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच हा विषय न्यायप्रविष्ट आहे, असे जन
माहिती अधिकाऱ्यांनी श्री.देसाई यांना कळविले. संबंधित नकाशे व अभिलेख पाहण्यासाठी
महापालिकेच्या संबंधित कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येतील, असेही जन माहिती
अधिकाऱ्यांनी श्री.देसाई यांना कळविले. पूरनियंत्रण रेषा व नदीपात्र या दरम्यानच्या भागात
कोणत्याही बांधकामाला परवानगी देण्यात आलेली नाही, असे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांनी

आपली दिशाभूल केली, तसेच माहिती नाकारली असे श्री.देसाई यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले.

संबंधित पूरनियंत्रण रेषा परिसर ( रेड झोन) पाटबंधारे खात्याने कळविलेला असल्याचे श्री.देसाई यांनी नमूद केले, परंतु महापालिकेने आपल्या कार्यपध्दतीनुसार संबंधित विभाग व त्यामधील बांधकामे याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप घेतलेला नाही, त्यामुळे दिलेली माहिती योग्य आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता श्री.नेत्रदीप सरनोबत व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री.कुणालकुमार यांनी केले. 'कोल्हापूर शहराची दुसरी सुधारित विकास योजना ही शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.टीपीसएस/२१९२/२३६९/पत्र क्र.१३५/९२/नवि-१३, दि.१८.१२.१९९९ अन्वये भागश: मंजूर असून ती दि.१.२.२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये निळ्या रंगाने पूरनियंत्रण रेषा दर्शविलेली आहे. तथापि शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे कोल्हापूरच्या मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये महत्तम पूररेषा प्रतिबंधित क्षेत्रामधील विकासाबाबत धोरणे ठरविणेबाबत तज्ज्ञ समिती गठीत करणेत आलेली असून त्याप्रमाणे अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दि.२७.४.२००६ च्या पत्रान्वये श्री.देसाई यांना कळविले होते. त्याबाबत श्री.देसाई यांचे मतभेद होते. हीच परिस्थिती अद्यापही कायम असल्याचे व याबाबतचा महापालिकेचा ठराव दोन दिवसांपूर्वीच झाला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा महापालिका आयुक्त श्री.कुणालकुमार यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय

प्राधिकारी यांनी हा तपशील अपीलकर्त्यास पूर्वीही स्पष्ट केला होता, परंतु पाटबंधारे विभागाने निश्चित केलेली पूरनियंत्रण रेषा व महानगरपालिकेच्या नियमानुसार करावयाची कार्यवाही याबाबत पुरेसे स्पष्टीकरण झालेले नसल्याचे व त्यातून माहिती न मिळाल्याचा अपीलकर्त्याचा समज झाल्याचे उभय बाजूंच्या निवेदनातून स्पष्ट झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) महानगरपालिकेची नियंत्रण रेषेबाबतची प्रक्रिया स्पष्ट करणारी, तसेच संदर्भित विभागातील अनधिकृत बांधकामांबाबत महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाही विषयीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.५. २००८**
मे-०८-६७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गिरीश रघुनाथ वाघ
औंध उरो व सर्वसामान्य रुग्णालय,
कामगार वसाहत, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा,
(हिवताप), विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर,
येरवडा, पुणे-४११ ००६

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा हिवताप अधिकारी,
येरवडा पोष्ट ऑफीसजवळ, बंगला नं.५, येरवडा, पुणे-४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गिरीश रघुनाथ वाघ, औंध उरो व सर्वसामान्य रुग्णालय,
कामगार वसाहत, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा,
(हिवताप), विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६
डॉ.सुभाष अमृत मोरे

**जन माहित्ती अधिकारी** तथा जिल्हा हिवताप अधिकारी,
येरवडा पोस्ट ऑफीसजवळ, बंगला नं.५, येरवडा, पुणे-४११ ००६
डॉ.सलील वसंतराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ मुंबई अर्ज क्र. ७४८/२००० नुसारच्या निर्णयानुसार क्षेत्र कर्मचारी पदावर कायमस्वरुपी कामावर केव्हा घेतले जाणार आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार कामावर घेण्याचे टाळाटाळ करण्याचे कारण काय, विलंबाची कारणे काय, कोणत्या अधिका-यांच्यामुळे विलंब झाला. बिंदु नामावली प्रमाणे खुल्या संवर्गासाठी किती पदे क्षेत्र कर्मचारी या पदासाठी राखीव असायला हवीत,एकूण क्षेत्र कर्मचारी पदासाठी किती पदे मंजूर आहेत, कार्यालयातील क्षेत्र कर्मचारी प्रत्यक्ष किती कार्यालयात कामावर हजर असतात, त्यापैकी किती कर्मचारी/अधिका-यांच्या घरी वैयक्तिक कामासाठी नेमण्यात आले त्यांची नावे, व सर्व माहिती

## विवेचन

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ मुंबई यांच्या निर्णयानुसार आपल्याला कायमस्वरुपी कामावर का घेतले जात नाही व केव्हा घेणार, आदी माहिती अपीलकर्ता श्री.गिरीश रघुनाथ वाघ यानी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी मुद्देनिहाय उत्तर दिले. त्याने समाधान न झाल्याने श्री.वाघ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक संचालक, हिवताप व हत्तीरोग कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी दखल न घेतल्याने श्री.वाघ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.वाघ यांनी यापूर्वीही याविषयी आयोगाकडे अपील केले होते. त्याचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी देऊन अपील अमान्य केले होते. श्री.वाघ यांची मूळ मागणी

कामावर घेण्याची असून हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, पुणे यांनी नमूद केले.

## आदेश

अपिलावर आयोगाने पूर्वीच निर्णय दिलेला असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ६.५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**मे-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरविंद इराप्पा बगतगिरी,
प्लॉट नं.९, यशोधन अपार्टमेंट, चैत्रबन सोसायटी,
नवी सांगवी, पुणे-४११ ०२७

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी कुलसचीव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कायदा अधिकारी,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१४ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अरविंद इराप्पा बगतगिरी,
प्लॉट नं.९, यशोधन अपार्टमेंट,
चैत्रबन सोसायटी, नवी सांगवी, पुणे-४११ ०२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी कुलसचीव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११ ००७ डॉ. श्री. बी. बी. चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा कायदा अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे- ४११ ००७ श्री. बी. डी. उढाणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पुणे विद्यापीठातर्फे घेतली जाणारी नेट-सेट परिक्षार्थीची सन २००० ते सन २००६ पर्यंतची यादी, मार्कांचा तपशील. श्री. निलेश चंद्रकांत आढाव (रा. पुणे विद्यापीठ आवार) यांच्या नेट सेटच्या सर्व पेपरची छायांकित प्रत व त्यांना नेट सेट मध्ये दिले गेलेल्या मार्कांचा तपशील

## विवेचन

श्री.निलेश चंद्रकांत आढाव यांच्या नेटसेटच्या सर्व उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती व दिल्या गेलेल्या गुणांचा तपशील अपीलकर्ता श्री.अरविंद इराप्पा बगतगिरी यांनी पुणे विद्यापीठाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितला होता. हा विषय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कक्षेतील असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्ज त्यांच्याकडे पाठविला. माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.बगतगिरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बगतगिरी यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही. तसेच दरम्यानच्या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून श्री.बगतगिरी याना उत्तर पाठविण्यात आले असल्याचे उभय बाजूंनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. विषय केंद्रिय माहिती आयोगाच्या कक्षेतील असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज/अपील करण्यास श्री.बगतगिरी यंना उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे डॉ.जी.श्रीनिवास यांनी दि.३.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

विषय केंद्रिय माहिती आयोगाच्या कक्षेतील असल्याने अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.५.२००८
May-२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.प्रकाश बाळकृष्ण कोलगे
मौजे कौलगे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे कौलगे,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ५५/कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश बाळकृष्ण कोलगे
मौजे कौलगे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.परिक्षीत दिलीप यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे कौलगे,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.व्ही.जी.महाजन

| | | |
|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.१५.४.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.२०.६.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.८.६.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. -- |

८. **मूळ मागणीचा तपशील**

( सन १९५० पासून आजतागायत अद्ययावत माहिती)

(अ)मौजे कौलगे ता.गडहिंग्लज येथील संपूर्ण दलित वस्तीच्या मोकळ्या जागेचे / गांवठाणाचे एकत्र नकाशासह (ज्यांचे नावावर गावठाण आहे त्यांची ) यादी मिळावी.

(ब)मौजे कौलगे, ता.गडहिंग्लज येथील फक्त दलित वस्तीतील नगर भूमापन क्र.४९५, क्षेत्रफळ २३७/५ चौ.मी. अस्तित्वात घराचे व घरालगत मोकळ्या जागेची किंमत भविष्यात खरेदी-विक्रीचे व्यवहारासाठी नकाशा (दाखला) मिळावा.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.प्रकाश बाळकृष्ण कोलगे यांनी मौजे कौलगे येथील दलित वस्तीच्या संदर्भात माहिती मागितली होती. संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेबक, ग्रामपंचायत मौजे कौलगे यांनी काही माहिती दिली व मूल्यांकनाचा विषय ग्रामसेवकाच्या कक्षेत येत नसल्याचे कळविले. माहिती तयार असून ती घेऊन जावी असे कळवूनही श्री.कोलगे आले नाहीत म्हणून माहिती टपालाने पाठविली. परंतु ती पत्रे परत आली. अर्जात नमूद केलेल्या पत्त्त्यावर श्री.कोलगे रहात नसल्याचे कळविले व तशी खात्री करुन घेण्यात आली असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे कौलगे श्री.व्ही.जी.महाजन यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. आपल्याला मुदतीत माहिती मिळाली नाही, उशिरा माहित मिळाल्याने ती आपण स्वीकारली नाही असे श्री.कोलगे यांनी सांगितले.

श्री.कोलगे यांनी मूळ अर्जात सन १९०० पासूनची माहिती मागितली होती. नंतर सन १९०० पासून शक्य नसल्यास सन १९५० पासूनची माहिती द्यावी असे कळविले. ग्रामपंचायत सन १९५२ मध्ये स्थापन झाली असून सन १९६३ पासून संबंधित घर अपीलकर्त्याच्या नावावर झाले, तेव्हापासूनची माहिती उशिरा दिली असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.जी.महाजन, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बी.ए.खवरे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,

पंचायत समिती गडहिंग्लज श्री.परिक्षीत यादव यांनी स्पष्ट केले. शासकीय सेवेत रुजू होऊन आपल्याला काही महिनेच झाले होते, त्यामुळे काही चुका झालेल्याअसू शकतील, परंतु हेतुपुरस्सर आपण कोणतीही माहिती टाळलेली नाही असे प्रतिपादन श्री.महाजन यांनी केले. गटविकास अधिकारी कार्यालयातील विस्तार अधिकाऱ्यांनी आपल्याला मानसिक त्रास दिला अशी तक्रार श्री.कोलगे यानी केली, परंतु माझी तक्रार अधिनियमाच्या संदर्भातील विषयाशी आहे या अधिकाराच्या संबंधित नाही. त्यामुळे त्याची दखल घेता येणार नाही.

संबंधित पत्त्यावर आपण रहात नसल्यास योग्य पत्ता जन माहिती अधिकाऱ्यांना व अपिलीय प्राधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक होते. तसेच उशिरा मिळाली म्हणून माहिती स्विकारावयाची नाही असे करणेही योग्य नव्हते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावण्याची व संस्थेला नुकसानभरपाई देण्याची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**कोल्हापूर**
**दि.१८.५.२००८**

मे-२००८

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.प्रकाश विष्णू चोपडे
मु.पो.कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ५६/कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

३.उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विष्णू चोपडे
मु.पो.कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.१३.१२.२००५ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. -- |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.-- |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.-- |

८. **मूळ मागणीचा तपशील**

सिध्देश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोडोलीमधील कर्जदारांची यादी व १०१ वसुली दाखले घेतलेल्या कर्जदारांची यादी.

अ)१ जानेवारी १९९५ ते आज (२००५) पर्यंतचे संस्थेच्या सर्व कर्जदारांची यादी.

ब)दि.१.१.२००० रोजी थकबाकीत दिसणारे तसेच तेथून पुढे आज तारखेअखेर २००५ सालापर्यंत थकबाकीत गेलेले थकीत कर्जदारांची यादी खालील माहितीसह

१.मूळ कर्ज रक्कम, आजअखेर थकीत कर्ज, मुद्दल व व्याज, आजअखेरपर्यंत वेळोवेळी भरलेल्या रकमा व तारखा.

क)वरील १.१.२००० मध्ये दिसणारे तसेच आजअखेर थकबाकीदार दिसणारेपैकी ज्यांचे १० वसुली दाखले मिळाले आहेत अशा थकबाकीदारांची यादी व दिलेले दाखल्याचे दिनांक

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होते. यापूर्वी पुणे येथील दि.१८.३.२००८ रोजी झालेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमातही अपीलकर्ता गैरहजर होते. त्यावेळीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असल्याचे निवेदन केले होते. सदर अपील आज दि.१३.१२.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोगापुढे सुनावणीस ठेवले होते. अपीलकर्ता गैरहजर असून लेखी निवेदनही सादर केलेले नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिल्याचे निवेदन कागदपत्रांसह यावेळीही केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपीलकर्ता यांना मांहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

कोल्हापूर
दि.१३.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:५७ /कोल्हापूर/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.सुनील बापूसो आंबी<br>मु.पो.उद्गाव(साखळे मळा), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार(तां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे-५ |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, पुणे-५ |

लट्टे एज्युकेशन सोसायटी, सांगली संचलित, सांगली हायस्कूल, सांगली कडील सेवकांच्या केलेल्या नियुक्त्या व त्यांना अदा करण्यात आलेले वेतन इ.बाबतची माहिती अपिलकर्त्याने मागितलेली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी सदर माहितीसाठी संस्थेकडे अर्ज करण्यास कळविण्याऐवजी माहिती-मागणीचा अर्ज पाच दिवसांच्या मुदतीत संबंधित संस्थेकडे पाठविणे आवश्यक होते. परंतु तसे केलेले दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपिलकर्त्यानी मागितलेली माहिती १५ दिवसांच्या आत अपिलकर्त्याला निःशुल्क प्राप्त करुन देवून त्याचा पूर्तता अहवाल आयोगाकडे सादर करण्यात यावा.

**पुणे**
**दि.२.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. रघुनाथ भगवान इंजे,<br>रा.मु.पो.निढळ, ता.खटाव, जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसिलदार, खटाव,<br>जि. सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसिलदार, खटाव, जि. सातारा |

अपीलकत्याने सन १९१५ ते १९३२ पर्यंतचा पेटा खाते उतारा मागितला होता. माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे असून अंशत: माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. तीनही घटकांमधील चर्चेनुसार अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती दहा दिवसात पुन्हा देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) दहा दिवसात अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाकडे सादर करण्यात यावा.

पुणे
दि.३१.०५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६० / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, नागाळा पार्क,<br>जि.प. कार्यालयासमोर, जि.कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर |

वरील तीनही घटकांमधील चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती मिळून त्यांचे समाधान झाले असल्याने आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २६.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. चंद्रकांत बाबुराव मिरजकर<br>प्लॉट क्र.४०, दत्तमंदिराजवळ, गर्व्हमेंट कॉलनी,<br>विश्रामबाग, सांगली, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर, जि. कोल्हापूर |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, सर्व संबंधितामध्ये एकमत झाले आहे. मृत्यूपत्रानुसार वारसनोंदी करणे हा विषय माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. नक्कलशुल्क नियमानुसार घेतलेले आहे. परंतु माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार प्रतिपृष्ठ रू. २ प्रमाणे शुल्क आकारून ऊर्वरित रक्कम परत करावी, अशी अपीलकर्त्याची मागणी आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी त्यांनी याबाबत विचार करण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे अपिलाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केलेले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.५.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिनकर गणपती कुंभार<br>रा. प्लॉट क्र.१, विद्या कॉलनी,( रूईकर कॉलनी लगत)<br>कोल्हापूर - ४१७ ००५ |
| ३ | जन माहिती अधिकारी | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याची मागणी दि.११.२.२००२ चे अर्जाबाबत दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून प्रशासकीय कारवाईबाबतची आहे. सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र अपीलकर्त्याच्या मागणीनुसार प्रशासकीय कारवाई करण्याबाबत अपीलकर्त्याने स्वतंत्र अर्ज करावा, व त्यानुसार कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२६ .५.२००८**

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. आनंदा भाऊ गोरे<br>रा. कृष्णाघाट, मिरज, ता. मिरज, जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत होऊन अपीलकर्त्याने माहिती अर्जाप्रमाणे सर्व माहिती आपणास मिळाली असून कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २० .५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,